# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## मा. झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाज कल्याण समिती
## कार्यपत्रिका क्रमांक : १२
## सभावृत्तांत

दिनांक : १७/३/२०१० वेळ : दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाज कल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक १७/३/२०१० रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.आदियाल (शीख) शोभा गुरुमितसिंग - सभापती
२. मा.काळूराम मारुती पवार
३. मा.तानाजी विठ्ठल खाडे
४. मा.रामआधार धारिया
५. मा.साबळे जगन्नाथ दगडु
६. मा.उत्तम मुक्ताजी हिरवे
७. मा.नितीन उर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ
८. मा.तापकीर मच्छिंद्र भाउसाहेब
९. मा.भुंबे बाळासाहेब दिगंबर

याशिवाय मा.कारचे - सहा.आयुक्त,चाकणकर- उप नगरसचिव,मा.लडकत - प्र.कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले-

विषय क्रमांक १) प्रभाग क्र.८८ मधील म्हातोबानगर व काळाखडक झोपडपट्टीमध्ये समाज मंदीर बांधणेबाबत..मा.शोभा आदियाल, मा.मच्छिंद्र तापकीर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक २) प्रभाग क्र.८८ मधील काळाखडक झोपडपट्टी मधील रस्त्याचे डांबरीकरण करणेबाबत..मा.शोभा आदियाल,मा.मच्छिंद्र तापकीर, यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक ३) प्रभाग क्र.८८ मधील म्हातोबानगर,काळाखडक व आण्णाभाउ साठेनगर झोपडपट्टीमध्ये वाचनालय व बाकडे (बेंचेस) बसविणेबाबत..मा.शोभा आदियाल,मा.मच्छिंद्र तापकीर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक ४) सेक्टर क्र.२२ येथील शाळा क्र.२/१ च्या आवारातील बहुउद्देशीय हॉलवर अभ्यासिकेसाठी मजला वाढविणेबाबत..मा.तानाजी खाडे,मा.उत्तम हिरवे यांचा प्रस्ताव..

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक : मा.बाळासाहेब भुंबे                    अनुमोदक : मा.उत्तम हिरवे

सोमवार दिनांक २२/३/२०१० रोजी दुपारी २.१५ पर्यत सभा तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

---------------

मा.सभापती : सोमवार दिनांक २२/०३/२०१० रोजी दुपारी २.१५ पर्यत सभा तहकूब करणेत येत आहे.

(आदियाल (शीख) शोभा गुरुमितसिंग)
सभापती
झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण आणि
समाज कल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## मा. झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाज कल्याण समिती
### कार्यपत्रिका क्रमांक : १२
### सभावृत्तांत
### ( दिनांक १७/०३/१० ची तहकुब सभा)

दिनांक : २२/३/२०१० वेळ : दुपारी २.१५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाज कल्याण समितीची दिनांक १७/३/२०१० ची तहकुब सभा सोमवार दिनांक २२/३/२०१० रोजी दुपारी २.१५ वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.आदियाल (शीख) शोभा गुरुमितसिंग - सभापती
२. मा.तानाजी विठ्ठल खाडे
३. मा.साबळे जगन्नाथ दगडू
४. मा.उत्तम मुक्ताजी हिरवे
५. मा.नितीन उर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ
६. मा.तापकीर मच्छिंद्र भाउसाहेब

याशिवाय मा.कारचे - सहा.आयुक्त,चाकणकर- उप नगरसचिव व मा.लडकत - प्र.कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

दिनांक १७/२/२०१० व ३/३/२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १० ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्रमांक - ४३ विषय क्रमांक - १
दिनांक- २२.३.२०१०
सुचक- मा.मच्छिंद्र तापकीर अनुमोदक - मा. तानाजी खाडे

संदर्भ - मा.शोभा आदियाल, मा.मच्छिंद्र तापकीर यांचा प्रस्ताव..

प्रभाग क्र.८८ मधील काळाखडक झोपडपट्टी व म्हातोबानगर झोपडपट्टीमध्ये समाज मंदिर बांधणेकामी अनुक्रमे र.रु.१५,००,०००/- प्रत्येकी रकमेचे प्रशासकीय खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक - ४४ विषय क्रमांक - २
दिनांक- २२.३.२०१०
सुचक- मा.मच्छिंद्र तापकीर अनुमोदक - मा. जगन्नाथ साबळे
संदर्भ - मा.शोभा आदियाल,मा.मच्छिंद्र तापकीर यांचा प्रस्ताव..

प्रभाग क्र.८८ मधील काळाखडक झोपडपट्टीमध्ये रस्त्याचे डांबरीकरण करणेकामी र.रु. १०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक - ४५ विषय क्रमांक - ३
दिनांक- २२.३.२०१०
सुचक- मा.मच्छिंद्र तापकीर अनुमोदक - मा.उत्तम हिरवे
संदर्भ - मा.शोभा आदियाल,मा.मच्छिंद्र तापकीर यांचा प्रस्ताव..

प्रभाग क्र.८८ मधील म्हातोबानगर, काळाखडक व आण्णाभाउ साठेनगर झोपडपट्टीमध्ये प्रत्येकी अनुक्रमे र.रु.१०,००,०००/- पर्यंत वाचनालय व बेंचेस बसविणेचे कामास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक - ४६ विषय क्रमांक - ४
दिनांक- २२.३.२०१०
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक - मा.उत्तम हिरवे
संदर्भ - मा.तानाजी खाडे,मा.उत्तम हिरवे यांचा प्रस्ताव..

सेक्टर क्र.२२ येथील शाळा क्र.२/१ च्या आवारातील बहुउद्देशीय हॉलवर अभ्यासिका बांधणेकामी र.रु.४०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(आदियाल (शीख)शोभा गुरुमितसिंग)
सभापती
झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण आणि
समाज कल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस/०९/कावि/४०७/२०१०
दिनांक :- २५ / ३ /२०१० सही/-

उपनगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.